| | |
|---|---|
| | रेग्युलर कज्जा क्रमांक . २६/२०१६<br>**(CNR No. MHKO110002242016)**<br><br>निशाणी १२७ खालील आदेश पारीत |

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. वादीचे कथन असे आहे की, वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे प्रतिवादी यांनी व तर्फे इसमांनी दावा मिळकतीचे कब्जा वहिवाटीस हरकत व अडथळा करु नये याकरिता अर्ज दाखल केलेला होता . सदर कामी वादी यांचा निशाणी ५ चा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज दिनांक १८.०२.२०१७ रोजी मंजूर करणेत आला होता. त्या आदेशावर नाराज होवून प्रतिवादी यांनी मे. जिल्हा न्यायालय कोल्हापूर येथे अपिल दाखल केले होते. वादीचे कथनानुसार सदरचे अपिल देखील निकाली झालेले आहे. त्यामुळे रे.क.नं.२६/२०१६ चे निशाणी ५ चे अर्जावर आजपावेतो तहकुबीचा आदेश नाही. अशी परिस्थिती असताना प्रतिवादी नं. १ ते ५ यांनी तसेच प्रतिवादी नं. १ ते ५ तर्फे इसमांनी कंटेम्पट ऑफ कोर्ट ॲक्ट १९७१ कलम २ ब मधील वि.प.क्र. ६ ते १३ यांनी वादीचे दावा मिळकतीमधील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करु लागलेने वादी यांनी वेळोवेळी वडगांव पोलिस ठाणेत लेखी तक्रार अर्ज दिला होता. प्रतिवादी नं. १ ते ५ यांनी वादी यांचे दावा मिळकतीमध्ये दिनांक २७.१०.२०१८ इ. रोजी संसारोपयोगी साहित्य, म्हणजेच भांडी, कपडे, स्टोव्ह व इतर साहित्य बेकायदेशिरपणे, अंगबळाचे जोरावर ठेवलेले आहे. त्यानंतर पुन्हा वादी यांनी वडगांव पोलिस ठाणेत वेळोवेळी तक्रारी अर्ज दिलेले आहेत. त्यामुळे वादी यांनी सदर अर्जाने अशी विनंती केली आहे की, दावा मिळकतीचे कब्जे वहिवाटीचे मा. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे संरक्षण करणेकरीता दोन पोलिस पुरुष तसेच दोन महिला पोलिस यांचेतर्फे पोलिस संरक्षण मिळणेत यावे.

३. वादीचे सदरचे अर्जास प्रतिवादी क्रमांक १,२,३ व ५ यांनी निशाणी १४८ ला म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की, वादीने प्रतिवादीची प्रतिमा

मलीन करणेकरिता खोट्या कथनांचे आधारे हा अर्ज दिलेला आहे. त्यामुळे तो अर्ज पुर्णतः खोटा व चुकीचा असून त्या अर्जातील सर्व कथनांचे प्रतिवादी यांनी स्पष्टपणे इन्कार केला आहे. सदर अर्जामध्ये वादीतर्फे एकूण १३ लोकांना वि.प. असे संबोधून सदरचा अर्ज दिलेला आहे. सदर वि.प.क्र. ६ ते १३ यांना या कामी सामिल करणेकरिता विनंती केलेली नाही तसेच नमुद ६ ते १३ या कामी पार्टीही नाहीत. त्यामुळे जे लोक मुळ दावेच्या अर्जामध्ये किंवा तुर्तातुर्त मनाईचे अर्जामध्ये पक्षकारच नाहीत त्यांचेविरुध्द त्यांना नमुद कामी पक्षकार पक्षकार म्हणून सामिल केलेशिवाय दादच मागता येणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज फेटाळणेत यावा अशी विनंती केली आहे. तसेच वादीला प्रतिवादीची दावा मिळकतीमधील कब्जेवहिवाट काढून घेणेकरिता पोलिसांचा वापर करता येणार नाही. त्या वस्तुस्थितीचा विचार करता वादीचा अर्ज फेटाळणेत यावा अशी देखील विनंती त्यांनी केली आहे.

४. वादीचे विधीज्ञ श्री.डी.एन.कुलकर्णी व प्रतिवादीचे विधीज्ञ श्री.यु.ए.महाजन यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच न्यायालयीन पटलावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झालेले आहेत. त्याचे निष्कर्ष त्याखाली दिलेल्या कारणमिमांसेस अनुसरुन देत आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १५१ प्रमाणे दाद मागणेस पात्र आहे काय ? | नकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अर्ज नामंजूर करणेत येत आहे. |

## कारणमिमांसा.

५. वादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ अतंर्गत दाखल केला आहे. कलम १५१ अंतर्गत तरतुदी खालीलप्रमाणे

> कलम १५१- न्यायालयाच्या अंगभुत शक्तीची व्यावृत्ती - या संहितेमधील कोणत्याही गोष्टीमुळे न्यायाची उद्दीष्टे साध्य करण्याकरीता किंवा न्यायालयाच्या कार्यवाहीचा दुरुपयोग

टाळण्यासाठी आवश्यक असतील ते आदेश काढण्याच्या न्यायालयाच्या अंगभुत शक्ती मर्यादित होतात किंवा त्यावर अन्यथा परिणाम होतो असे मानण्यात येणार नाही.

६. अर्जातील कथने पाहता वादी यांनी सदर अर्जामध्ये वि.प.म्हणून नं. ६. आक्काताई दत्तु बुरुड, ७. रेखा दत्तु बुरुड, ८.सुलोचना दत्तु बुरुड, ९. कु. मेघा तुकाराम पोवार , १०. कु.कल्याणी शिवाजी माने, ११.राजु किसन पलसे,१२. तुकाराम लक्ष्मण पोवार, १३. शिवाजी बापु माने, यांना सामील केले आहे. परंतू मुळ दाव्यामधील प्रतिवादींची नांवे अनुक्रमे १. श्रीमती द्रौपदी उर्फ दृपदा लखु बुरुड, २. सौ. लक्ष्मी शिवाजी माने, ३. सौ. शोभा आण्णाप्पा बुरुड, ४. सौ. पुष्पा किसन पलसे, ५. सौ. सुगंधा तुकाराम पोवार अशी आहेत. दाव्याच्या मुख्य सरनाम्यात अर्जात नमुद वि.प.(प्रतिवादी) क्र. ६ ते १३ यांची नावे नाहीत. सबब जे दाव्यात पक्षकार नाहीत यांच्या विरुध्द दाद मागण्याचा अधिकार वादीस नाही. वादीने सदरचा अर्ज निशाणी ५ चे अंतीम निर्णयाचे आधारे दाखल केला आहे. सबब वर नमुद केल्याप्रमाणे या अर्जातील वर नमुद केलेप्रमाणे अर्जदार क्र. ६ ते १३ निशाणी ५ मध्ये पक्षकार नाहीत. सबब ज्या इसमांनी अडथळा केला असे कथन वादीने केले व त्या आधारे पोलिस संरक्षणाची मागणी करणे न्यायोचीत नाही.

७. न्यायालयीन पटलावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादीने अर्जदार क्रमांक ६ ते १३ यांनी दावा मिळकतीमध्ये येवून हरकत अडथळा केला याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा या कामी दाखल नाही.

८. वादीचे विधीज्ञ यांनी निशाणी १६८ लगत पुरसीस देवून ***Guidelines for grant of police aid for implementation of court orders*** या मार्गदर्शक सुचनांचा कागद हजर केला आहे. वरील मार्गदर्शक तत्वे याकामी लागु पडत असली तरी वर विवंचलेप्रमाणे वादी यांनी सदर अर्जामध्ये जे दावेची कामी पक्षकार नाहीत त्यांचे विरुध्द दाद मागीतली आहे. सबब, अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. वादीचे विधीज्ञांनी निशाणी १७३ ला दिवाणी न्यायालय,क.स्तर.वडगांव यांचेकडील रे.क.नं. १०८/२०१३ मधील निशाणी ६० लगत दि. १३.११.२०१३ रोजी आदेश पारीत केलेल्याची सहिशिक्याची नक्कल दाखल केलेली आहे. कायद्यातील तरतुदींचा विचार करता दिवाणी न्यायालय, क.स्तर.वडगांव यांचेकडील आदेश या न्यायालयावर बंधनकारक नाही. सबब वादीचे विद्वान वकिल यांनी दाखल केलेला रे.क.नं. १०८/२०१३ मधील निशाणी ६० वरील निर्णय या अर्जाचे निर्णयाच्या वेळी विचाराधीन घेता येणार

नाही.

९. प्रतिवादीचे विधीज्ञ यांनी खालील न्यायनिवाडे न्यायालयीन पटलावर दाखल केले.

१. मा. सुप्रीम कोर्ट ऑफ इंडिया (२००६)४ एससीसी ५०१, पी.आर.मुरलीधरण आणी इतर विरुध्द स्वामी परमानंद दिफ्राथा पाडर आणि इतर

२. मा.मद्रास हायकोर्ट एआयआर २००६ मद्रास १८६ .अब्दुल सुखुरेभाई उर्फ दुराई कुप्पस्वामी.

३. एआयआर २००० आंध्रप्रदेश २१४ ऑल इंडिया रिपोर्ट ,आंध्र प्रदेश पी.शंकरराव विरुध्द श्रीमती बी.सुशिला.

१०. वरील सर्व न्यायनिवाडे हे या अर्जातील व प्रतिवादीने घेतलेल्या आक्षेपांशी सुसंगत असल्याने ते या कामी प्रतिवादी यांना पुरक ठरत असल्याचे या न्यायालयाचे मत आहे. सबब वरील कारणमिमांसेचा विचार करता वादी यांनी प्रतिवादी अथवा तर्फे इसमांनी हरकत अडथळा त्यांचे कब्जे वहिवाटीस केला याबाबतचा कोणताही सबळ पुरावा न्यायालयीन पटलावर दाखल न केल्याने तसेच जे मुळ कामामये पक्षकार नाहीत त्यांचेविरुध्दकायद्याच्या दृष्टीने दाद मागणे न्यायोचीत नसल्याने सदरचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. सबब मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी देत असून मुद्दा क्रमांक २ चे उत्तराचे निष्कर्षाप्रत खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश.

अर्ज खर्चासह नामंजूर करणेत येत आहे.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषित करणेत आला)

PANKAJ BHAGATSINGH RAJPUT

Digitally signed by PANKAJ BHAGATSINGH RAJPUT
Date: 2022.04.06 12:49:09 +0530

दिनांक ०५.०४.२०२२. (श्रीमती पंकज बी.राजपूत),

दुसरे सह.दिवाणी न्यायाधिश,क.स्तर
पेठवडगांव.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Mrs. Rajashri Rajendra Sawant (L.G.) |
| Name of Court | Smt. Pankaj B. Rajput 2nd Jt. Civil Court & J.M.F.C. Peth-Vadgaon. |
| Date of Dictation | 05.04.2022. |
| Judgment signed by the P.O. on | 05.04.2022. |
| Judgment uploaded on | 06.04.2022. |